दि चिल्ड्रन एड सोसायटी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मानखुर्द, मुंबई या विद्यमान संस्थेमध्ये "वेल्डर" या व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्यास इरादापत्र (LOI) देण्याबाबत...

महाराष्ट्र शासन
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग
शासन निर्णय क्र. आयटीआय- २०२५/प्र.क्र.८३/व्यशि-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२६

वाचा:- १) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांचे पत्र क्र.०७/खा.औ.प्र. संस्था/इरादापत्र प्रस्ताव/२०२५/२३५, दि. ०२.०५.२०२५

२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, शासन निर्णय, समक्रमांक, दि.५.२.२०२६.

प्रस्तावना :-

व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत पात्र खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरू करण्यास/तुकडीवाढ करण्यास शासनाची मान्यता मिळण्यासाठी शिफारशी करण्यात आल्या आहेत. त्याअनुषंगाने वाचा येथील दि.५.२.२०२६ च्या शासन निर्णयान्वये सन २०२६-२०२७ या वर्षापासून कायम विना अनुदान तत्वावर नवीन खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थां सुरू करण्यास /तुकडीवाढ करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदरहू संस्थांशिवाय उर्वरित संस्थांना सन २०२६-२७ पासून मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०२६-२०२७ या वर्षापासून, दि चिल्ड्रन एड सोसायटी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अगर वाडेगाव जवळ, सायन पनवेल हायवे, ता. जि. मुंबई या कायम विनाअनुदान तत्वावरील विद्यमान खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये "वेल्डर" या अभ्यासक्रमाची १+१ तुकडया सुरु करण्यास, वाचा येथील दि.५.२.२०२६ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी-शर्तीपैकी (१ ते १७) ज्या अटी-शर्ती सदरहू संस्थेस लागू होतील, त्या अटी-शर्तीचे पूर्णतः पालन करण्याच्या अधिन राहून इरादापत्र (LOI) देण्यात येत आहे.

२. सदरचे शासन शासन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक क्रमांक २०२६१०२९१६१९१४८६०३ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by VAISHALI MANISH SULE
Date: 2026.10.29 16:20:49 +05'30'

(वैशाली सुळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई/नाशिक/पुणे/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर विभाग.
५) दि चिल्ड्रन एड सोसायटी खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, अगर वाडेगाव जवळ, सायन पनवेल हायवे, मानखुर्द, मुंबई
६) संबंधित अशासकीय संस्था (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयामार्फत)
७) निवड नस्ती (व्यशि-३ कार्यासन)